शिका, संघटित व्हा, संघर्ष करा.

# प्रज्ञा

वर्ष पहिले | अंक दुसरा | नोव्हेंबर 2024

डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय येरवडा, पुणे चे वार्तापत्र

अध्यक्ष : श्री. आनंदराज आंबेडकर | उपाध्यक्ष : डॉ. दत्ता देशकर | सचिव : श्री. संजीव बोधनकर | प्राचार्य : डॉ. गौतम बनसोडे | संपादक : प्रा. सचिन गुळीग

संपादक मंडळ : डॉ. अनिल घोलप, प्रा. सुवर्णा कांबळे | विद्यार्थी प्रतिनिधी : पल्लवी कांबळे, रतन शिंदे

## संपादकीय




लोकशाही दोन प्रकारची असते, म्हणजे प्रत्यक्ष आणि प्रातिनिधिक. थेट लोकशाहीत, सर्व नागरिक, निवडून आलेल्या किंवा नियुक्त अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीशिवाय, सार्वजनिक निर्णय घेण्यात सहभागी होऊ शकतात. अशी व्यवस्था केवळ सामुदायिक संस्था किंवा आदिवासी परिषदेतील तुलनेने कमी लोकांसह व्यावहारिक आहे. तर प्रातिनिधिक लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला त्यांच्या प्रतिनिधीला मतदान करण्याचा अधिकार आहे. लोक पंचायत, नगरपालिका मंडळे, राज्य विधानसभा आणि संसदेपासून सर्व स्तरांवर त्यांचे प्रतिनिधी निवडतात. भारतात प्रातिनिधिक लोकशाही आहे.

लोकशाही हा शासनाचा एक प्रकार आहे ज्यामध्ये जनतेने निवडलेले राज्यकर्ते सर्व प्रमुख निर्णय घेतात. सध्याच्या राज्यकर्त्यांना बदलण्यासाठी निवडणुका लोकांना निवड आणि न्याय्य संधी देतात. ही निवड आणि संधी सर्व लोकांना समान आधारावर उपलब्ध आहे. या निवडीचा उपयोग राज्यघटनेच्या मूलभूत नियमांद्वारे आणि नागरिकांच्या हक्कांद्वारे मर्यादित सरकारकडे नेतो.

लोकशाही सरकार हे एक चांगले सरकार आहे कारण ते सरकारचे अधिक उत्तरदायी स्वरूप आहे. मतभेद आणि संघर्षांना सामोरे जाण्यासाठी लोकशाही एक पद्धत प्रदान करते. त्यामुळे लोकशाही निर्णयक्षमतेची गुणवत्ता सुधारते. लोकशाहीचा फायदा हा आहे की चुका जास्त काळ लपवता येत नाहीत. सार्वजनिक चर्चेसाठी जागा आहे, आणि दुरुस्तीसाठी जागा आहे. एकतर राज्यकर्त्यांना त्यांचे निर्णय बदलावे लागतील किंवा राज्यकर्ते बदलता येतील. लोकशाही चांगल्या निर्णयाची चांगली संधी देते. हे लोकांच्या स्वतःच्या इच्छेचा आदर करते आणि विविध प्रकारच्या लोकांना एकत्र राहण्याची परवानगी देते. जरी ते यापैकी काही गोष्टी करण्यात अयशस्वी झाले तरीही, ते त्याच्या चुका सुधारण्याचा मार्ग देते आणि सर्व नागरिकांना अधिक सन्मान प्रदान करते. म्हणूनच लोकशाही हा शासनाचा सर्वोत्तम प्रकार मानला जातो.

संपादक : **सचिन गुळीग**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
संपर्क : 9545600535

## महाविद्यालयाची क्षणचित्रे



अविष्कार झोनल लेवल स्पर्धा 2024

दिनांक 26 नोव्हेंबर 2024 रोजी समिती सदस्य प्रा. वर्षाराणी वाघमारे, डॉ. अनिल घोलप, डॉ. श्रेयशी परब व इतर प्रा. सुवर्णा कांबळे व प्रा. सचिन गुळीग यांनी सक्रिय योगदान दिले. या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या त्यात आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन उत्कृष्ट प्रदर्शन केले.

1) श्वेता साबळे (MA-2): हायड्रोपोनिक शेती: एक वरदान
2) पायल मोहिते (SYBA): इलेक्ट्रिक वाहने: काळाची गरज
3) नंदिनी कांबळे (TYBA): मोत्यांची शेती
4) गोविंद पांडे (MCOM-2): पुणे शहरातील गणेशोत्सवाचे अर्थकारण
5) स्नेहल कांबळे (SYBA): क्लाऊड किचन असे विविध विषय सादरीकरण करून आपल्या महाविद्यालयाचे नाव रोशन केले.




डॉ. आंबेडकर महाविद्यालयात 'संविधान दिन' साजरा

डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सार्वजनिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत प्रा. शिवाजी मोटेगावकर यांनी संविधान दिनाचे महत्व अगदी मोजक्या शब्दात विशद केले. प्रा. जगदीश गाणार यांनी भारतीय संविधानाचे महत्व विशद करणारे अभ्यासपूर्ण असे मनोगत मांडले. संविधान हा भारतीय लोकशाहीचा आत्मा असून आज हे संविधान धोक्यात असल्याचे परखड मत प्रा. गाणार यांनी मांडले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक प्रा. प्रेरणा उमरखेडी, प्रा. रमेश साळुंखे आणि इतर प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. नारायण खरात यांनी भारतीय संविधानाच्या सरनाम्याचे वाचन केले.



महात्मा फुले स्मृतिदिन : अभिवादन

डॉ. आंबेडकर महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

दिनांक 28 नोव्हेंबर 2024 या दिनी महाविद्यालयात प्रतिमा पूजन व अभिवादन केले कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रीमा खरे यांनी केले. तर प्रा. जगदीश गाणार सर यांनी फुले यांचे कार्य, सुधारणा मोजक्या शब्दात विश्लेषित केले. सदर कार्यक्रमास प्राचार्य डॉ. गौतम बनसोडे व इतर प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# गौतम बुद्धांची प्रेरणादायी वचने

- दुःख मनाचा स्थायीभाव आहे, त्याला नष्ट करण्याचे काम मनुष्याचे आहे.
- द्वेषाने द्वेष नष्ट होत नाही तर केवळ प्रेमाने द्वेष नष्ट होतो.
- त्याने मला शिव्या दिल्या, त्याने मला मारले, त्याने मला हरवले, त्याने मला लुबाडले, असा विचार जे लोक करीत बसतात त्यांचे वैर कधीच संपत नाही. आणि असा विचार जे लोक करीत नाही त्याचे वैर संपुष्टात येते.
- भिक्षुनो बहुजनांच्या हितासाठी बहुजनांच्या सुखासाठी मार्गक्रमण करा.
- भूतकाळात राहू नका, भविष्याची स्वप्ने पाहू नका, वर्तमान क्षणावर मन एकाग्र करा."
- "दररोज सकाळी आपला पुनर्जन्म होतो. आज आपण जे करतो ते सर्वात महत्त्वाचे आहे."
- "जर तुम्ही कोणासाठी दिवा लावलात तर त्याने तुमचा मार्गही उजळून निघेल."
- "आनंद त्यांच्याकडे कधीच येणार नाही जे त्यांच्याकडे आधीपासून असलेल्या गोष्टींचे कौतुक करण्यात अपयशी ठरतात."
- "रागाला धरून राहणे म्हणजे दुसऱ्यावर फेकण्याच्या उद्देशाने गरम कोळसा हातात पकडण्यासारखे आहे; तुम्हीच जळत आहात."
- "तुमचा सर्वात वाईट शत्रू तुमचे स्वतःचे असुरक्षित विचार."
- "प्रत्येक गोष्टीत काहीतरी चांगलं पाहण्यासाठी तुमच्या मनाला प्रशिक्षित करा."
- "तुम्ही जितके शांत व्हाल तितके तुम्हाला ऐकू येईल."
- "आपल्या विचारांनी आपण जग घडवतो."
- "ज्याने शहाणपणाने जीवन जगले आहे त्याला मृत्यूची भीती देखील वाटत नाही."
- "तुम्ही तेच गमावाल ज्याला तुम्ही चिकटून राहता."
- "तुम्ही तुमच्या मनावर राज्य करा, नाहीतर दुसरे तुमच्यावर राज्य करेल."
- "दुःखाचे मूळ आसक्ती आहे."
- "हे पाण्यापासून शिका: नाला मोठ्याने शिंपडतो पण समुद्राची खोली शांत आहे."
- "तृष्णा हे मानवाच्या दुःखाचे खरे कारण आहे."
- "हे तिहेरी सत्य सर्वांना शिकवा: उदार अंतःकरण, दयाळू भाषण आणि सेवा आणि करुणामय जीवन या गोष्टी मानवतेचे नूतनीकरण करतात."

लेखक **- प्रा. रीमा खरे**
सहाय्यक प्राध्यापक इतिहास

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 निकाल

VOTE

| | | |
|---|---|---|
| 1. भारतीय जनता पक्ष | - | 132 |
| 2. शिवसेना/शिंदे | - | 57 |
| 3. राष्ट्रवादी/अजित पवार | - | 41 |
| 4. शिवसेना/ठाकरे गट | - | 20 |
| 5. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | - | 16 |
| 6. राष्ट्रवादी/शरद पवार गट | - | 10 |
| 7. इतर | - | 10 |
| 8. अपक्ष | - | 02 |

एकूण जागा - 288
सरकार स्थापन करण्यासाठी - 144
आमदारांचे संख्याबळ आवश्यक.

**लक्षात ठेवावे असे काही.**

| | | |
|---|---|---|
| 1. भाजप | - | 26.77% |
| 2. शिवसेना (शिंदे) | - | 12.38% |
| 3. राष्ट्रवादी (अ.प.) | - | 9.01% |
| 4. कॉंग्रेस | - | 12.42% |
| 5. शिवसेना (ठाकरे) | - | 9.96% |
| 6. राष्ट्रवादी (श.प.) | - | 11.28% |
| 7. मनसे | - | 1.55% |
| 8. नोटा | - | 0.72% |

**सर्वात जास्त मताने निवडणूक आलेले**

| | | |
|---|---|---|
| 1. काशिराम पावरा | - | 1,59,044 |
| 2. शिवेंद्रराजे भोसले | - | 1,42,124 |
| 3. धनंजय मुंडे | - | 1,40,224 |
| 4. दिलीप बोरसे | - | 1,29,297 |
| 5. आशुतोष काळे | - | 1,24,824 |

**सर्वात कमी मतांनी निवडून आलेले**

| | | |
|---|---|---|
| 1. मुफ्ती मोहम्मद | – | 162 |
| 2. नाना पटोले | – | 207 |
| 3. मंदा म्हात्रे | – | 377 |
| 4. संजय गायकवाड | – | 841 |
| 5. शिरीषकुमार नाईक | – | 1121 |

- राज्यातील पाहिले मतदान केंद्र - मणिबेल (ता.अक्कलकुवा - जिल्हा नंदुरबार)
- राज्यातील शेवटचे मतदान केंद्र - कोंतेव बोबलाद (ता.जत - जिल्हा सांगली)
- राज्यातील पहिल्या मतदार - रविता तडवी
- राज्यातील शेवटचा मतदार कुमार संजय लोणार
- राज्यातील पहिला विधानसभा मतदारसंघ - नंदुरबार
- राज्यातील शेवटचा विधानसभा मतदारसंघ - जत (288)



# अमेरिका निकाल

अमेरिकेत राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी मतदान पार पडलय. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी या निवडणुकीत बाजी मारली आहे. डेमोक्रॅटिक उमेदवार कमला हॅरिस यांचा पराभव झाला आहे. डोनाल्ड ट्रम्प आता दुसऱ्यांदा सत्तेवर आले आहेत.

अमेरिकेच्या या निवडणुकीवर भारतासह सगळ्या जगाची नजर होती. अमेरिकेत ट्रम्प यांचा पुनरागमन हे भारतासह आशिया खंडातील हिंदुंसाठी एक मोठा टर्निंग पॉइंट आहे. "भारत-अमेरिकेची जागतिक रणनितीक भागीदारी भक्कम करण्याचा माझा प्रयत्न असेल. आपण एकत्र येऊन आपल्या लोकांच्या भल्यासाठी तसच जागतिक स्तरावर शांतता, स्थिरता आणि समृद्धी आणण्यासाठी एकत्र काम करु" असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

# मराठीसह पाच भाषांना अभिजात दर्जा

अखेर केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबतची घोषणा केली आहे. मराठीसह एकूण पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. मराठीबरोबरच पाली, प्राकृत, आसामी व बंगाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी आता अनुदानासह केंद्र सरकारच्या पातळीवरसुद्धा सर्व ते सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे".

आतापर्यंत तमिळ, संस्कृत, मल्याळम, तेलुगू, कन्नड आणि ओडिया या सहा भाषांना हा दर्जा मिळाला होता. त्यात आता मराठी, बंगाली, पाली, प्राकृत व आसामी भाषेचा समावेश झाला आहे.

**प्राचार्य - डॉ. गौतम बनसोडे**

# चोखोबांचे अभंग आणि बाबासाहेब आंबेडकरांची आठवण





अबिर गुलाल उधळीत रंग।
नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग॥

हा अभंग ऐकून खूप प्रसन्न वाटले पण 'पायरीशी होऊ दंग गाऊनी अभंग ' ही ओळ ऐकली आणि स्तब्ध झाले अक्षरशः डोक्यात विचारचक्रे फिरू लागली .आणि चोखोबांची पुस्तके शोधली असता डॉ. पद्मावती क्षोत्रिय यांचे संत 'चोखामेळा आणि परिवार - विवेचक अभ्यास ' हे पुस्तक वाचले आणि त्यांच्या हृदयस्पर्शी अभंगांना असलेली तीव्र वेदनाची झालर दिसून आली.

उच्च कोटीची काव्य प्रतिभा अध्यात्मात असलेली अनुभूती परमपवित्र अशा आत्मा आणि परमात्म्याचे जुळलेले बंध , परमेश्वरा प्रति संपूर्ण समर्पण इतके सर्व असूनही फक्त महार जातीत जन्मल्यामुळे समाजातील उच्च जातीकडून होणाऱ्या मानसिक शारीरिक अनन्वित अश्या छळाला त्या काळात तरी काहीच उत्तर नव्हते असे दिसते .

तेरावे शतक म्हणजे संतांची मांदियाळीचा सहवास लाभलेला समाज म्हणावा लागेल. त्यांनी निर्माण केलेल्या संतसाहित्यातून संतांनी समाजाला मानवतेची शिकवण तर दिलीच परंतु समाज प्रबोधनही केले. तरिही भक्तिमार्गात सर्व थरातील व्यक्तिना समान वागणूक दिली जात असली तारिही त्या वेळच्या समाजाने संतानाही मर्यादा टाकल्या होत्या म्हणूनच आपणास त्या काळातील समाजाने संत चोखोबाना मंदीर प्रवेश नाकारला होता हे पहावे आणि पचवावे लागते त्यावेळी नक्कीच आपणास बाबासाहेबांच्या संघर्षाची आठवण आल्याशिवाय राहत नाही .

संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत मुक्ताबाई इत्यादी संतांचा संत चोखोबांच्या घरी राबता असायचा. संत मंडळीत चोखोबांना आदराचे स्थान होते परंतु तरीही चोखोबांना उच्चनीचतेचे समाजाकडून मिळणाऱ्या हीन वागणुकीचे चटके बसायचे ते बसलेच !

विठ्ठलावर निस्सीम भक्ती असून सुद्धा त्यांना विठ्ठलाचे दर्शन किंवा चरण स्पर्श करता आला नाही. त्यांच्या अनेक अभंगातून ही सल आपणास जाणवते सुलतानशाहीचा काळ आणि त्या काळात महार जातीतील व्यक्तीला त्यांची इच्छा असो नसो सक्तीने वेठबिगारी करावी लागायची. गावातली मेलेली जनावरे ओढूण गावाबाहेर नेणे, कष्टाची व हलकी समजली जाणारे कामे यांना करावी लागत असत तरीही मनाने चोखोबा सदैव विठ्ठल भजनात दंग असायचे. ब्राह्मणांनी अनन्वित छळ केल्यावरही चोखोबांचे विठ्ठला प्रति प्रेम कधीही कमी झाले नाही परंतु कधीकधी अभंगातून त्या वेदना स्पष्ट दिसतात. संत ज्ञानेश्वर परिवार, संत नामदेव यांच्या परिवारानंतर संपूर्ण संत परिवाराच्या यादीत आपणास संत चोखोबांच्या परिवाराचे नाव आदराने घ्यावे लागते कारण पत्नी संत सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, बहीण निर्मळा त्यांचे पती बंका हे सर्व संत मांदियाळीत होते.

जोहार मायबाप जोहार।
तुमच्या महाराचा मी महार॥
चोखा म्हणे पाटी आणली।
तुमच्या उष्ट्यासाठी आणली॥

असे अभंग वाचले की त्या काळाची भीषण सामाजिक परिस्थिती डोळ्यासमोर उभे राहते. उच्च जातीनी माणूस म्हणून जगण्याचा सुद्धा अधिकार या लोकांकडून हिरावला होता. प्रत्येक पावलागणिक मानसिक शारीरिक हीनत्वाची वागणूक आणि त्यातून त्यांचे कायमचे झालेले खच्चीकरण !

परंतु बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून जे सर्वांना समान सन्मानाच्या धाग्यात बांधले तसेच कायद्याच्या चौकटीत अशा उच्चनीचतेच्या वागणुकीवर बंधने घातली कडक बंधने घातली या खच्चीकरण झालेल्या वर्गाला अगोदर त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करून दिली तसेच या अन्यायाच्या जागेवर त्याना सर्वांना समान सन्मान मिळायला हवा मग ते मानसिक शारीरिक ,सामाजिक असू दे नाहीतर राजकीय असू दे . खरंच माणूस म्हणून परमेश्वराने जरी जन्माला घातले असेल तरीही माणूस म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य अशाच महापुरुषांच्या तीव्र संघर्षामुळे आज मीतिला या वर्गाला मिळालेले आहे यात कोणतीच शंका नाही .

परंतु बाबासाहेब आंबेडकरांनी जी शिक्षणाची , विचार स्वातंत्र्याची, सामाजिक सन्मानाची दारे उघडी केली आहेत त्यांची खरी आठवण ठेवून अन् त्यावरच मार्गस्थ झाल्यावरच सर्वांचा खरा व संपूर्ण अंतर्बाह्य विकास होईल हेच खरे !

**सविता विठ्ठल बागल**
संशोधक विद्यार्थी

# संविधानाची पंच्याहात्तरी



- 6 डिसेंबर 1946: संविधान सभेची स्थापना (फ्रेंच पद्धतीनुसार)
- 9 डिसेंबर 1946 : सच्चिदानंद सिन्हा तात्पुरते अध्यक्ष
- 11 डिसेंबर 1946: राजेंद्र प्रसाद यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली
- 13 डिसेंबर 1946 : जवाहरलाल नेहरू यांनी उद्दिष्टांचा ठराव मांडला तीच पुढे प्रस्तावना झाली
- 22 जानेवारी 1947: उद्दिष्टांचा ठराव मंजूर
- 22 जुलै 1947 : राष्ट्रध्वज स्वीकारला गेला
- 15 ऑगस्ट 1947 : भारताला स्वातंत्र्य मिळाल
- 29 ऑगस्ट 1947 : मसुदा समिती स्थापना (डॉ बाबासाहेब अध्यक्ष - 7 सदस्य होते)
- 16 जुलै 1948: हरेंद्र कुमार मुखर्जी यांच्यासोबत, व्हीटी कृष्णमाचारी यांचीही संविधान सभेचे दुसरे उपाध्यक्ष म्हणून निवड
- 26 नोव्हेंबर 1949 : संविधान सभेने राज्यघटना स्वीकारली
- 24 जानेवारी 1950: संविधान सभेची शेवटची बैठक (सर्वांनी स्वाक्षरी केली) राष्ट्रगीत स्वीकारले
- 26 जानेवारी 1950: राज्यघटना लागू झाल

**या गोष्टी पण वाचून घ्या एकदा**

- या प्रक्रियेला 2 वर्षे, 11 महिने आणि 18 दिवस लागले
- एकूण ₹6.4 दशलक्ष खर्च झाले.
- एकूण 11 सत्रे झाली
- नागरिकत्व, निवडणुका, तात्पुरती संसद, तात्पुरत्या आणि संक्रमणकालीन तरतुदींशी संबंधित तरतुदी 26 नोव्हेंबर 1949 पासून तात्काळ लागू करण्यात आल्या
- संविधान सभेत 15 महिला सदस्य होत्या
- प्रेम बिहारी नारायण रायजादा यांनी संविधान लिहून काढले
- "हत्ती" हे संविधान सभेचे चिन्ह म्हणून स्वीकारले गेले.
- राज्यघटनेचा मूळ मजकूर "इंग्रजी आणि हिंदी" या दोन भाषांमध्ये हस्तलिखित होता.
- सविधानावर पहिली स्वाक्षरी : राजेंद्र प्रसाद
- संविधानावर शेवटची स्वाक्षरी : फिरोज गांधी
- राज्यघटनेत काढलेली चित्रे : प्रेम बिहारी, बेओहर राममनोहर सिन्हा आणि नंदलाल बोस यांसारख्या शांतीनिकेतनच्या चित्रकारांच्या कलात्मक स्पर्शाने काढलेली आहे

राज्यघटना स्वीकारल्याच्या घटनेला 75 वर्षे पूर्ण होत आहेत.

- **श्वेता साबळे,** एम.ए. 2

# ईव्हीएम मशिन



**ईव्हीएम मशिन बद्दल संपूर्ण माहिती**

ईव्हीएम म्हणजे इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन

- ईव्हीएम मध्ये
- BU - बॅलेट युनिट
- CU- कंट्रोल युनिट
- VVPAT- व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल यांचा समावेश होतो
- सध्या M3 हे मॉडेल वापरले जात आहे
- ईव्हीएम पहिल्यांदा वापर : 1982 मध्ये केरळच्या परूर विधानसभा पोटनिवडणुकीत
- VVPAT पहिल्यांदा वापर : 2013 मध्ये नागालँडच्या नोक्सेन विधानसभा पोटनिवडणुकीत
- ईव्हीएम सिस्टीम जास्तीत जास्त 2,000 मतांची नोंद करू शकते (पण max 1500 करतात)
- प्रत्येक बॅलेट युनिट वर : 16 उमेदवार (NOTA धरून)
- एकाच वेळी 24 बॅलेट युनिट वर जोडले एकत्र जोडले जाऊ शकतात : त्यामुळं जास्तीत जास्त 384उमेदवार यावर येऊ शकतात (NATO सहित)
- ईव्हीएम हे स्वदेशी आहे भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (BEL) आणि इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (ECIL) या दोघांनी मिळून बनवले आहे
- ईव्हीएम आणि VVPAT ला कोणत्याही बाह्य वीज पुरवठ्याची आवश्यकता नाही
- VVPAT स्लिप आकार : अंदाजे 99mm x 56mm आहे.
- VVPAT : ज्याची प्रिंट ठेवण्याची क्षमता सुमारे पाच वर्षे असते.

- **ज्योती वाघमारे,** M.A.1st

# गोष्ट पाण्याची ( भाग 2 )

मागील भागात आपण पाण्याचे महत्व अभ्यासले. आज आपण पाण्याचे गणित अभ्यासू या. आपण कोळशाच्या खाणीतून कोळसा काढतो. एक दिवस असा येतो की खाणीतील सर्व कोळसा काढल्यानंतर ती कोळसा देणे बंद करते. असाही एक दिवस येणार आहे की जगातील सर्व कोळसा संपून जाणार आहे. पण पाण्याचे तसे नाही बरं का. १००० वर्षांपूर्वी जगात जेवढे पाणी होते तेवढे आजही आहे. ते कधी समुद्रातील खाऱ्या पाण्याच्या स्वरुपात दिसते. कधी ते नदीतील वा सरोवरातील गोड्या पाण्याच्या स्वरुपात दिसते तर कधी ते वाफेच्या वा बर्फाच्या स्वरुपात दिसते. एवढेच नाही तर कधी ते हवेतील दमटपणाचे स्वरुपात दिसते. कधा कधी ते खारपुटीच्या जंगलात ओलाच्या रुपात आढळून येते. याचा स्पष्ट अर्थ असा की जगातील एकूण पाण्याचा साठा स्थिर आहे. तो वाढतही नाही आणि घटतही नाही. असे असेल तर पाणी प्रश्न का निर्माण झाला आहे बरे? ते आपल्याला हवे त्यावेळी वा हवे त्या प्रमाणात मिळत नाही म्हणून.

जगातील एकूण पाण्यापैकी ९७ टक्के पाणी हे समुद्रात खाऱ्या पाण्याचे स्वरुपात आहे. ते न पिण्याच्या कामाचे ना शेतीच्या कामाचे. बकीचे ३ टक्के हे गोडे पाणी आहे जे वापरुन आपण जगतो आहोत. या गोड्या पाण्याचे दोन भाग पडतात. एक म्हणजे भूपृष्ठावरील पाणी आणि दुसरे म्हणजे भूगर्भातील पाणी. याला आपण भूजल म्हणतो. काही भागात (जसे अमरावती जिल्हा, अकोला जिल्हा व बुलढाणा जिल्हा) भूजल हे खाऱ्या स्वरुपात आहे. कधी काळी इथे समुद्र होता म्हणून तिथले भूजल आजही खारे आहे. भूपृष्ठावरील जवळपास सर्वच पाणी बर्फाचे स्वरुपात आहे. आकड्यांचे भाषेत बोलायचे झाल्यास ७० टक्के पाणी हे बर्फाचे स्वरुपात तर ३० टक्के पाणी भूजलाचे स्वरुपात आहे. मग आपल्यासाठी शिल्लक काय उरले? वरील दोनही आकडे हे ढोबळ मानाचे आहेत. आहे ... त्यामधे एक बारीक फट आहे. ती आहे ०.१ टक्क्याची. ते आहे नद्यांतील पाणी, सरोवरातील पाणी जे आपल्यासाठी उपलब्ध आहे. हेच पाणी आपण पिण्यासाठी, आंघोळीसाठी, कपडे धुण्यासाठी, शेतीसाठी, कारखान्यांसाठी वापरतो. आपल्याला हे एवढे मोठे वाटत असले तरी एकूण पाण्याच्या मानाने ते अगदीच नगण्य आहे.

हे उपलब्ध पाणी प्रामुख्याने तीन कारणांसाठी वापरले जाते. ते तीन प्रकार म्हणजे शेतीसाठी, मानवी वापरासाठी आणि कारखान्यांसाठी. ८० टक्के पाणी शेती वापरते. पाच ते सात टक्के पाणी आपण वापरतो तर बाकीचे पाणी कारखाने वापरतात. दिवसेंदिवस आर्थिक विकासाबरोबर कारखाने वाढत आहेत. त्यांची पाण्याची गरज वाढत आहे. त्यांना जास्त पाणी द्यायचे झाल्यास शेतीचे पाणी कमी करावे लागेल. आता येथे प्रश्न आला कलहाचा. प्रत्येकाला पाणी हवे आहे पण कोणीही आपली गरज कमी करायला तयार नाही. कलह वाढत गेला तर शेवटी त्याची परिणती युद्धात होवू शकते. म्हणूनच असे म्हणतात की तिसरे महायुद्ध झाले तर ते पाण्यामुळे होईल. ते होवू द्यायचे की सामंजस्याने प्रश्न सोडवायचा हे आपल्या हातात आहे. आपल्याला भगवान बुद्धाच्या जीवनातील एक कथा वाचल्याचे आठवतच असेल. शाक्य आमि कोळिया या दोन जमातीत नदीच्या पाणी वाटपाचा प्रश्न निर्माण झाला. ताण वाढत वाढत प्रसंग युद्धाचा आला. भगवान बुद्धाने मध्यस्थी करुन तो प्रश्न सामंजस्याने सोडविला. त्यासाठी राज्याचा त्याग करण्याची पाळी आली तरी तो मागे हटला नाही. आपल्याला बुद्ध हवा, युद्ध नको असे जे म्हंटले जाते ते त्यामुळेच.

आज दशांदेशांमधे, राज्याराज्यामधे पाण्यासाठी तणाव वाढत आहे. एकच नदी विविध देशांतून, राज्यातून वाहाते. मग या नदीचे पाणी तुझे की माझे हा प्रश्न येणारच. आफ्रिकेतील नाईल नदी तर १० देशांतून वाहाते. कावेरी नदी कर्नाटक व तामिलनाडू मधून वाहते. हे एक उदाहरण झाले. असे सर्वत्र घडतांना दिसत आहे. मग हा प्रश्न सोडवायचा कसा हा गहन प्रश्न निर्माण होतो. भगवान बुद्धाच्या विचारांचा पगडा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर पडलेला आहे. भारतात कायदे मंत्री असतांना ही बाब जेव्हा त्यांच्या लक्षात आली तेव्हा भारतात हा प्रश्न सलोख्याच्या मार्गाने सोडविला जावा यासाठी बाबासाहेबांनी यासाठी खास कायदा पास केला. असा प्रश्न निर्माण झाला तर त्यासाठी लवाद स्थापण्याची कल्पना त्यांनी या कायद्यात मांडली. आजही या कायद्याचा आधार घेवून भारतातील पाणी प्रश्न सोडवला जात आहे. हा बुद्ध तत्वज्ञानाचा प्रत्यक्षात वापरच नव्हे काय?

- **डॉ. दत्ता देशकर**



# द प्रॉब्लेम ऑफ द रूपी : इट्स ओरिजिन अ‍ॅन्ड सोल्युशन

द प्रॉब्लेम ऑफ द रूपी : इट्स ओरिजिन अ‍ॅन्ड सोल्युशन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा शोध प्रबंध ऑक्टोबर १९२२ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एस.सी.) च्या पदवीसाठी प्रस्तुत केला होता. जो डिसेंबर, १९२३ मध्ये पुस्तकरूपात प्रकाशित झाला. त्याचे थोडक्यात विश्लेषण करण्याचा हा छोटासा प्रयत्न

ज्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्लंड व अमेरिकेत उच्च शिक्षण घेत होते त्या काळात ब्रिटीशांचा भारतावर एकछत्री अंमल होता. ब्रिटिशांनी कायदे करायचे आणि त्याची कडक अंमलबजावणी करायची अशी यंत्रणा इंग्रजांनी तयार केली होती आणि हे करीत असताना या सर्वांचा आर्थिक फायदा इंग्लंडला करून द्यायचा हे धोरण ठरलेले होते. याच सगळ्या व्यवस्थेचे वाभाडे काढायचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी द प्रॉब्लम् ऑफ द रूपी या प्रबंधामध्ये केले आहे.

हा प्रबंध तयार करताना आंबेडकरांनी याची सात प्रकरणामध्ये मांडणी केली आहे. त्या प्रकरणांचा थोडक्यात उपापोह.

१. भारतामध्ये दुहेरी चलन परिमाण वापरले जायचे त्यात सोने मुख्य परिमाण म्हणून तर रुपया आणि चांदी हे परिमाण हे दुय्यम म्हणून वापरले जायचे. परंतु ब्रिटिशांनी चांदीचे परिमाण का वापरायला सुरवात केली यावर चर्चा या प्रकरणात केलेली दिसते.

२. चांदी या परिमाणाच्या वापरामुळे रुपयाचे मूल्य कसे विस्कळीत झाले यावर चर्चा या प्रकरणात केलेली आहे.

३. चांदी या परिमाणाच्या वापरामुळे रुपयाचे आणि सोन्याचे मूल्य स्थिर असताना कसे अस्थिर झाले यावर चर्चा केलेली आहे.

४. या प्रकरणात रुपयाचे चलन सुवर्ण विनिमय परिमाणाकडे कसे वाहत गेले यावर चर्चा.

५. ब्रिटीशांचा प्रवास सुवर्ण परिमाणाकडून सुवर्ण विनिमयाकडे कसा झाला यावर चर्चा.

६. या प्रकरणात विनिमय परिमाणाच्या स्थिरतेवर चर्चा झालेली आहे.

७. या प्रकरणात सोन्याच्या परिमाणाकडे परत येण्याची मागणी व मिमासा तसेच त्याची सविस्तर कारणे यावर चर्चा करण्यात आलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काढलेले काही निष्कर्ष यांचा अभ्यास केला असता, जे.एम.केन्स यांनी दिलेल्या सुवर्ण विनिमय परिमाणावरील सिद्धांतानुसार सुवर्ण विनिमय परिमाण हे लवचिक असते. आंबेडकरांनी हे मत खोडून सुवर्ण विनिमय परिमाण म्हणजे दुधारी तलवार असते ज्यामुळे भारतात प्रचंड भाववाढ होत आहे. रुपायची किंमत घसरते आहे तसेच रुपया अस्थिर होत आहे हा निष्कर्ष काढला.

जे.एम.केन्स यांनी सांगितल्या प्रमाणे अनेक देशाने चांदीचा त्याग केल्यामुळे, चांदीची मागणी कमी झाली आहे त्यामुळे त्याचा विपरीत परिणाम चांदीच्या किमतीवर झालेला आहे. आंबेडकरांनी हे मत खोडून काढेले आणि रुपयाच्या अवमुल्यनाचे हे खरे कारण नसून दोन देशातील होणारी किंमत पातळीतील तफावत आहे. असे कारण पुढे केले आहे.

सुवर्ण विनिमय परिमाणापेक्षा सुर्वण परिमाण वापरणे हे भारतासारख्या देशाला अधिक फात्द्याचे होईल. असा उपाय सुद्धा आंबेडकरांनी या प्रबंधामध्ये सुचवला आहे..

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा प्रबंध सादर करण्या आधी स.न. १७०० पासून १८५८ पर्यंत ब्रिटिशांनी केलेल्या कायद्यांवरील अहवालांचा अभ्यास केला. तसेच स.न. १८५८ ते १९०० पर्यंत ब्रिटिशांनी केलेल्या कायद्यांचा अभ्यास केला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनचे मार्गदर्शक म्हणून Prof. Adwin Canan यांनी काम पहिले होते..

शब्दांकन

**Asst. Prof. Sachin Kamble**
Dr. Ambedkar College of Arts and Commerce, Pune. Mob: 8806060450

# नोव्हेंबर विशेष



**१) दिवाळी का साजरा केला जातो**

ज्याला दीपावली/दीपावली म्हणूनही ओळखले जाते, हा एक हिंदू धार्मिक सण आहे जो अंधारावर (किंवा वाईट) प्रकाशाच्या (किंवा चांगल्या) शक्तींच्या विजयाचे प्रतीक म्हणून " प्रकाशांचा उत्सव " म्हणून साजरा केला जातो. हा दरवर्षी भारतातील अनेक राज्यांमध्ये, परंतु विशेषतः उत्तर, पश्चिम आणि पूर्व भारतात साजरा केला जातो..

**२) १ नोव्हेंबर - जागतिक शाकाहारी दिवस**

दरवर्षी 1 नोव्हेंबर रोजी, शाकाहारी आहार आणि सर्वसाधारणपणे शाकाहारीपणाचे फायदे याबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी जागतिक शाकाहारी दिवस साजरा केला जातो. UK व्हेगन सोसायटीच्या 51 व्या वर्धापनदिनानिमित्त पहिला शाकाहारी दिवस 1 नोव्हेंबर 2023 रोजी आयोजित करण्यात आला होता.

**३) १ नोव्हेंबर - सर्व संत दिन**

दरवर्षी 1 नोव्हेंबर रोजी सर्व संतांचा सन्मान करण्यासाठी ऑल सेंट्स डे पाळला जातो. ख्रिश्चनांसाठी ख्रिश्चन इतिहासातील सर्व संत आणि हुतात्म्यांना, ज्ञात आणि अज्ञात, लक्षात ठेवण्याची संधी मानली जाते. ऑल सेंट्स डेला ऑल हॅलोज डे किंवा हॅलोमास असेही म्हटले जाते..

**४) ७ नोव्हेंबर - राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिवस**

7 नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिवस कर्करोगाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि जागतिक आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी पाळला जातो. माजी केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. हर्षवर्धन यांनी 2014 मध्ये राष्ट्रीय कर्करोग जागरुकता दिवसाची स्थापना करून लोकांमध्ये परिस्थितीबद्दल जागरूकता निर्माण केली..

**५) संविधान दिवस**

२६ नोव्हेंबर १९४९ मध्ये भारतीय संविधान सभेने भारताची राज्यघटना स्विकारली. त्यामुळे, २६ नोव्हेंबर हा दिवस 'भारतीय संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. परंतु, संविधान सभेने ही राज्यघटना स्विकारल्यानंतर देशात त्याची अंमलबजावणी होण्यास काही महिने लागले. २६ जानेवारी १९५० रोजी ही राज्यघटना पूर्णपणे लागू करण्यात आली..

**६) महात्मा फुले पुण्यदिन**

ज्योतिराव गोविंदराव फुले हे 19 व्या शतकातील एक महान विचारवंत, समाज सेवक, लेखक, क्रांतिकारी समाजसुधारक होते. त्यांना महात्मा फुले या नावानेही ओळखले जाते. 28 नोव्हेंबर रोजी महात्मा फुलेंची पुण्यतिथी..

**- मसू गायकवाड** (SYBA)

# कोणता झेंडा घेऊ हाती?



भारतातील खास करून महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक परिस्थिती गढूळलेल्या अवस्थेत आहे, राजकीय, सामाजिक क्षितिजावर घडणाऱ्या अनेक विस्मयकारक घटनांचा सामान्य लोकांवर आणि लोकशाही वर परिणाम होतोच पण त्याचा जास्त परिणाम हा कार्यकर्त्यांवर होतोय. कार्यकर्त्यांची संभ्रमावस्था निर्माण होते, खरं सांगायचं म्हणजे कार्यकर्त्यांचे अक्षरशः बारा वाजलेत. पक्ष/संघटना निष्ठा की, विचार/समाज निष्ठा? याबद्दल त्याचा सामाजिक व राजकीय कामातील उत्साह दिवसेंदिवस क्षीण होतोय. आणि जर त्याच्यातील कार्यकर्ता मरण पावला तर हे कोणत्याही पक्षाला कधीच परवडणारं नाही.

**- स्नेहा कांबळे (SYBA)**

# चारोळ्या आयुष्याचे



चार काय करतोस
काहितरी करून दाखव...
वेळ जाईल निघून
प्रवाहामध्ये तरून दाखव...
लाखो आले आणि गेले
बोलून उपदेश सगळे
स्वतः काही नाही केले
फक्त उपदेश दिले...
उपदेशाचे कडू तू पिऊन तर बघ

सत्याची साथ तू देऊन तर बघ
हिंमत आहे तुझ्यात,
आयुष्याचा शिखर चढण्याची
स्वतःवर विश्वास ठेवून तर बघ...
हीच वेळ आहे,
योग्य पाऊल पुढे टाकण्याची
काहीतरी करून दाखवण्याची...
घाबरू नकोस, निर्णय घे
यश तुझ्याच हातात आहे....

**-हार्दिक शाह**

# तुमच्या शरीराचे अवयव व त्याला निष्काळजीपणामुळे होणारे आजार...



१) **पोट :** केव्हा बिघाडते, जेव्हा तुम्ही सकाळी नाष्टा करत नाही.......

२) **मूत्रपिंड :** केव्हा बिघडतात जेव्हा तुम्ही २४ तासात १० ग्लास पाणी पीत नाही......

३) **पित्ताशय :** केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही ११ च्या आत झोपत नाही व सूर्योदया पूर्वी उठत नाही........

४) **लहान आतडे :** केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही थंड आणि शिळे अन्न खाता.......

५) **मोठे आतडे :** केव्हा बिघडते,जेव्हा तुम्ही तळलेले आणि मसालेदार पदार्थ जास्त खाता.......

६) **फुफ्फुसे :** केव्हा बिघडतात, जेव्हा तुम्ही धूर, धूळ आणि सिगारेट बिडी ने प्रदूषित वातावरणात श्वास घेता........

७) **यकृत :** केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही तळलेले, जंक आणि फास्ट फूड खाता......

८) **हृदय :** केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही जास्त मीठ मिश्रित व चरबीयुक्त तसेच रिफाइंड तेल अशा प्रकारचा आहार घेता.......

९) **स्वादुपिंड :** केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही सहज मिळतात आणि चविष्ट लागतात म्हणून जास्त गोड पदार्थ खाता......

१०) **"डोळे" :** केव्हा बिघडतात, जेव्हा तुम्ही अंधारात मोबाईल व कॉम्प्युटर वर काम करता......

११) **"मेंदू" :** केव्हा बिघडतो, जेव्हा तुम्ही नकारात्मक विचार करता.......

*निसर्गाने "माफत" मध्ये दिलेल्या शरीराच्या "अवयवाची" योग्य "काळजी" घ्या योग प्राणायाम करा शरीर "स्वस्थ" तरच आपण "मस्त" "शरीराचे" कोणते ही"अवयव" हे बाजारा मध्ये मिळत नाहीत आणि चुकून मिळाले तरी खूप महाग आणि आपल्या शरीरात योग्य पद्धतीने सुट होऊन बसतीलच असे नाही म्हणून आपल्या "शरीरातील अवयवांची" नेहमी काळजी घ्या........

**- संकलन- रत्न शिंदे (MA-1)**

# नौकरी अपडेट

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या | - | ६९० जागा |
| 2. | महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनीमध्ये तंत्रज्ञ पदांच्या | - | एकूण ८०० जागा |
| 3. | इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियात प्रशिक्षणार्थी पदांच्या | - | १८७ जागा |
| 4. | स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या | - | १७१ जागा |
| 5. | औद्योगिक विकास बँक यांच्या आस्थापनेवर विविध पदांच्या | - | ६०० जागा |
| 6. | राष्ट्रीय तपास संस्थेच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण | - | १६४ जागा |
| 7. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या आस्थापनेवर विविध पदांच्या | - | २५३ जागा |
| 8. | गेल (इंडिया) लिमिटेड यांच्या आस्थापनेवर विविध पदांच्या | - | २७५ जागा |
| 9. | इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या | - | २४० जागा |
| 10. | उत्तर पूर्व सीमा रेल्वे विभागात प्रशिक्षणार्थी पदांच्या | - | एकूण ५६४७ जागा |
| 11. | राष्ट्रीय बियाणे महामंडळाच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या | - | १८८ जागा |

(नौकरी विषयक जाहिरातींचे सर्वात जलद अपडेट्स मिळवण्यासाठी “www.MahaNMK.com" या संकेतस्थळाला दररोज भेट द्या किंवा गूगल वर नेहमी "Maha NMK" असे सर्च करा.)

**आरती कांबळे**
एस.वाय. बी.ए.